दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९


# पुणे विद्यापीठ


**शैक्षणिक विभाग**
गणेशखिंड, पुणे-४११००७.
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ernet.in
इ-मेल : dyracademic@unipune.ernet.in


संदर्भ क्र. अभि/९८३८

दिनांक १४/१२/०९

प्रति,
मा. अध्यक्ष/सचिव,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,
अवसरी(खु।।)
ता. आंबेगाव जि. पुणे.

विषय : शैक्षणिक वर्ष २००९–१० या एका वर्षाकरिता नवीन महाविद्यालय सुरू करण्यास परवानगी देण्याबाबत.
संदर्भ : शासन निर्णय क्र. जीईसी–२००९/(९२/०९)/ तांशि–४, दि. १५ जून, २००९.

महोदय,

वरील विषयाच्या संदर्भात प्राप्त झालेल्या आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेच्या वरील महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २००९–१० या एका वर्षाकरिता बी.ई. १) कॉम्प्युटर इंजि. २) ई. अॅण्ड टी. सी.३) ऑटोमोबाईल इंजि. ४) मेकॅनिकल इंजि. प्रत्येकी ६० प्रवेश क्षमता या अभ्यासक्रमांचे नवीन महाविद्यालय शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अवसरी(खु।।) ता. आंबेगाव जि. पुणे येथे कायम विना अनुदान तत्त्वावर सुरू करण्यास अहवालातील अटी व शर्तींची पूर्तता विद्यापीठाचे पत्र निर्गमित झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत पूर्ण करण्याच्या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८१ मधील तरतुदींच्या अधिन राहून व पुणे विद्यापीठ अध्यादेश १७१ प्रमाणे बॅंकेत ठेव ठेवणे महाविद्यालयावर बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे नवीन महाविद्यालय सुरू करताना ए.आय.सी.टी.ई. नवी दिल्ली/महाराष्ट्र शासन/विद्यापीठ नियमानुसार आवश्यक प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर सेवकांची नियुक्ती करणे महाविद्यालयावर बंधनकारक राहतील. तसेच पुणे विद्यापीठ व महाराष्ट्र शासनाद्वारे वेळोवेळी अस्तित्वात येणारे नियम आपणास बंधनकारक राहतील, याची नोंद घ्यावी.

आपल्या महाविद्यालयाचा आय.डी. नंबर **(Id.No. PU/PN /Engg/395/2009)** असा आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

**सोबत : अहवाल.**

17-12-09

\\Sandip\Administrator\My Documents\Ranawade\letter.doc

दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

# पुणे विद्यापीठ

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे-४११००७.
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ-मेल : dyracademic@unipune.ac.in

संदर्भ क्र. संलग्न/४६२४

दिनांक :25/10/2010

सुधारित पत्र

प्रति,

१ प्रा.डॉ.जे.व्ही.कुलकर्णी (अध्यक्ष)
व्ही.आय.टी. पुणे–३८

२. प्रा. मुसमाडे
एन.डी.एम.व्ही.पी.चे, कॉलेज ऑफ
इंजि. गंगापूर रोड, नाशिक.

३ प्रा. व्ही.डी.पाटील
आय.टी.टी.टी.आर. पुणे

४. प्रा. एस.एम. भाटी
संदिप फौंडेशनचे,
संदिप इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी
ॲण्ड रिसर्च सेंटर, पो. ऑ.
महिरावणी,
जि.नाशिक–४२२ २१३

**विषय :** शैक्षणिक वर्ष २०१०–११ या एका वर्षाकरिता अभ्यासक्रम नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यास परवानगी देण्यासाठी स्थानिक चौकशी समिती नियुक्तीबाबत.

**संदर्भ :** शासन निर्णय — संकिंर्ण २०१०/(१८८/२०१०)/ताशिं–४, दि.३०/७/२०१०

महोदय,

खालील महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१०–११या एका वर्षाकरिता अभ्यासक्रम नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यास परवानगी देण्यासाठी आपली चौकशी समिती नियुक्त केलेली आहे. सदर महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन अंतर्गत सुविधांची (इमारत, पुस्तके, शिक्षक/ शिक्षकेतर सेवक, विद्यार्थीसंख्या, क्रिडांगण इत्यादी) पाहणी करुन महाविद्यालयास सुरू करण्यास शैक्षणिक वर्ष २०१०–११ या एका वर्षाकरिता परवानगी द्यावी किंवा कसे याबाबत स्पष्ट शिफारशीसह व सदस्यांच्या स्वाक्ष–यांसह अहवाल या कार्यालयास सादर करण्यासाठी आपली चौकशी समिती नियुक्त केली आहे.

विद्यापीठ नियमानुसार आपणास विद्यापीठाचे वाहन उपलब्ध करुन हवे असल्यास कमीत कमी तीन सदस्यांनी एकत्रित भेट देणे आवश्यक आहे. तसेच वाहन विषयक मागणी प्रत्येक्ष भेट देण्यापूर्वी कमीत कमी आठ दिवस लेखी स्वरुपात करणे आवश्यक आहे.

काही कारणाने आपणास समितीवर काम करणे अशक्य असल्यास कृपया हे पत्र मिळताच आपल्या चौकशी समितीचे मा. अध्यक्ष, तसेच मा. कक्षाधिकारी, संलग्नता कक्ष, शैक्षणिक शाखा, पुणे विद्यापीठ, पुणे–७. यांनाही त्वरीत कळवावे की, जेणेकरुन या विषयी विद्यापीठास योग्य ती पुढील कार्यवाही करणे शक्य होईल. समितीमधील सदस्यांना विनंती करण्यात येते की, संबंधित संस्थेचे महाविद्यालयांमध्ये किंवा व्यवस्थापन मंडळावर सेवक/सदस्य नाहीत असे प्रमाणपत्र अहवाल सोबत जोडावे.

तरी आपणांस विनंती की, त्वरीत संबंधित महाविद्यालयांना भेट देऊन सर्व सदस्यांच्या स्वाक्ष–यांसह व महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या हमीपत्रासह अहवाल विद्यापीठाकडे हे पत्र मिळाल्यापासून १ महिन्याच्या आत सादर करावा. तसेच अहवाल मिळाल्यानंतर नियमानुसार दैनिक भत्ता व प्रवास भत्ता दिला जाईल. आपल्या सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा आहे.

स्थानिक चौकशी समितीच्या पहिल्या भेटीनंतर त्यांच्या अहवालातील अटी व शर्तींच्या पूर्ततेबाबतचा एकसदस्यीय पडताळणी अहवाल मा. अध्यक्ष यांनी स्वत: महाविद्यालयास पुन:श्च भेट देऊन तीन महिन्यांच्या आत विद्यापीठास सादर करावा.

**कृपया अहवालासोबत हे पत्र जोडावे. तसेच प्रवासभत्ता देयके एकत्रित पाठवावीत.**

| अ क्र | महाविद्यालयाचे नांव | शैक्षणिक वर्ष २०१०–११या एका वर्षाकरिता अभ्यासक्रम नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यास परवानगी देणेबाबत. |
|---|---|---|
| १. | शासकिस अभियंत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी खु!! ता. आबेगाव जि.पुणे | बी.ई.–<br>१.इन्स्टुमेशन ॲण्ड कंट्रोल इंजि.<br>२.सिव्हील इंजि.<br>प्रत्येकी ६० विद्यार्थी प्रवेश क्षमता<br>हे अभ्यासक्रम नव्याने सुरू करण्यासाठी |

मा.अध्यक्षांना विनंती की, आपला अहवाल मुदतीत सादर करणे गरजेचे असल्याने संस्था/ महाविद्यालयाने भेटीची वेळ वर नमूद केलेल्या मुदतीत म्हणजेच पत्र प्राप्त झाल्यापासून १ महिन्यात निश्चित न केल्यास, अध्यक्षांनी सदस्यांसमवेत चर्चा करून तारीख निश्चित करून भेट द्यावी. तसेच आपला अहवाल मुदतीत सादर करावा.

**तसेच आपली समिती महाविद्यालयास भेट देताना महाविद्यालयाने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची प्रभावी अंमलबजावणी केली आहे किंवा नाही, याबाबतची प्रत्यक्ष पहाणी करून सदरबाबतची माहिती आपल्या समितीच्या अहवालामध्ये नमूद करून द्यावी.**

**टीप: यापूर्वीचे पत्र जा.क्र सीए/४४४२ दि. १३/१०/२०१० रद्द समजण्यात यावे.**

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

**<u>प्रत माहितीसाठी सादर रवाना :–</u>**

१) मा. प्राचार्य, संबंधित महाविद्यालय.

यांना विनंती की, समितीच्या भेटीच्या वेळी योग्य ती कागदपत्रे दाखवून समितीस सहकार्य करावे. तसेच आपल्या महाविद्यालयास चौकशी समिती चे पत्र मिळताच समितीच्या अध्यक्ष व इतर सदस्यांची त्वरीत संपर्क साधून भेटीची तारीख निश्चित करुन घ्यावी व चौकशी समितीने भेट दिल्या नंतर अहवाल पुणे विद्यापीठाकडे सादर करण्याबाबत वेळोवेळी मदत करण्यात यावी.

२) मा. वित्त व लेखा अधिकारी, पुणे विद्यापीठ, पुणे–७.

३) गृहव्यवस्थापक, पुणे विद्यापीठ, पुणे–७.